
गंगापूरे Maths क्लासेस
दशकपूर्ती
सोहळा
सन २०१६

## इ. स. २०१६ चे इयत्ता ८ वी व ९ वी चे क्लासेसचे विद्यार्थी



अक्षर जुळवणी :

**श्री विनय पिंगळे**

डिझाईन व मुद्रक :

**महालक्ष्मी डिजीटल, औसा**

: विशेष सहकार्य :

- प्रा. युवराज हालकुडे
- प्रा. चव्हाण ए. जी
- प्रा. तोडकरी एस. एस
- प्रा. गंगापुरे डि. एल
- प्रा. दादासाहेब पाटील
- श्री कोकाटे सर
- श्री संजीव कुमार सुर्यवंशी सर
- प्रा. युवराज बालगीर सर

# श्रद्धांजली



## कै. श्री प्रभुअप्पा देवंग्रे

**आधारस्तंभ**

# आशिर्वचन



श्री माधव कचरू गंगापुरे गुरूजी यांना माझे अनेक शुभ आशिर्वाद.
गेल्या १० वर्षांपासुन श्री माधव गंगापुरे गुरूजी हे औसा शहरातील व परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना अतिशय मोलाच असं शैक्षणिक मार्गदर्शन करीत आहेत.

शहरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची आजच्या काळात नितांत गरज आहे. ज्ञानदान हे खुप श्रेष्ठ दान आहे. माणसाची खरी ओळख हि त्याच्या ज्ञानावरून होत असते. माणुस हा ज्ञानप्राप्तीमुळेच खऱ्या अर्थाने संपन्न व सुसंस्कारीत होत असतो. श्री अविनाश गणपत चव्हाण गुरूजी हे सुध्दा गत पाच वर्षांपासुन त्यांना सहकार्य करून ज्ञानदानात मदत करित आहेत. आपल्या विद्यार्थ्यांची हि अडचण ओळखुन हे गुरूजी ज्ञानदानाची खुप मोठी व अतिशय महत्वाची कामगीरी बजावत आहेत. आपल्या या शैक्षणिक कार्यातूनच त्यांना खरे समाधान प्राप्त होवोत व उत्तरोत्तर या कार्याच्या माध्यमातून आपली प्रगती होवो व आपल्या हातून यशवंत - किर्तिवंत विद्यार्थी दिवसेंदिवस घडो हिच श्री पांडूरंग चरणी प्रार्थना.

**- ह. भ. प. सद्‌गुरू गुरूबाबा महाराज**
पिठाधिपती, नाथ संस्थान, औसा.

दशकपुर्ती सोहळा

# चार शब्द



गंगापुरे क्लासेस मध्ये प्रविष्ठ झाल्याबददल आपले हार्दिक अभिनंदन आणि आपल्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा !

आदरणीय पालक, क्लासेसचे आधारस्तंभ, माझे प्रिय विदयार्थी - विदयार्थीनी, हितचिंतक, गुरू, मित्र यांना माझा सप्रेम नमस्कार, आपणा सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व आशिर्वादामुळेच गंगापुरे क्लासेसचा दशकपुर्ती सोहळा साजरा होत आहे. याचा मनस्वी मला आनंद होत आहे. कोणतेही कार्य असो त्यामध्ये घेतलेली मेहनत , थोरांचे मार्गदर्शन व त्याला मिळणारी खंबीर साथ यामुळेच ते कार्य सिध्दीस जाते यात शंका नाही. इ.स. २००५ मध्ये फक्त ८ विदयार्थ्यांपासुन सुरूवात केलेला क्लासेसचा वेलु आज औसा तालुक्याच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये खंबीरपणे उभा आहे तो केवळ आणि केवळ माझ्या प्रिय विदयार्थ्यांच्या परिश्रममामुळेच.... विदयार्थी व पालक यांच्या क्लासेसवरचा विश्वास. हेच माझ्यासाठी खुप मोठी अभिमानास्पद बाब आहे. माजी विदयार्थी कोठेही असोत ते आजही माझी आस्थेवाईकपणे चौकशी करून मला भावनिक साद घालतात. अशा वेळी ह्रदय भरून येत.... मी फक्त त्यांना मार्गदर्शन केले पण त्यांनी परीश्रम व अभ्यासाची सचोटी देऊन उज्वल भविष्यच घडविले.

क्लासेस मार्फत चालविले जाणारे विविध उपक्रम जसे साप्ताहीक चाचणी परिक्षा पुर्व-वार्षिक परिक्षा, उच्च स्तरीय विचार कौशल्य (HOTS) यावर आधारीत उदाहरणे सोडविणे, यामध्ये विदयार्थ्यांसाठी केलेले उत्तम सहकार्य यामुळेच क्लासेसची यशस्वी वाटचाल होत आहे. सन २००८ ते सन २०१४ पर्यंत क्लासेसचे विदयार्थ्यांनी तालुक्यातूनच नव्हे तर लातूर विभागातून तव्दतच गणित विषयात महाराष्ट्रातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे. आज क्लासेसचे माजी विदयार्थी , डॉक्टर्स, इंजिनिअर्स, शिक्षक होवून सेवा देत आहेत. हेही जसे थोडके !

इ.स. २०१० मध्ये तर गणितामध्ये १५० पैकी १५० गुण घेऊन चार विदयार्थी महाराष्ट्रात प्रथम येवून क्लासेसच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला व एक विक्रम केला. तज्ञ पालकांनीही वेळोवेळी क्लासेसच्या प्रगतीबददल तसेच कमतरतेबददल गरज भासेल तेंव्हा मार्गदर्शन करून त्या कमतरता दुर करण्याचा प्रयत्न केला. तसेच समर्थ इंग्लीश क्लासेसचे संचालक श्री चव्हाण सर, श्री लददे सर, श्री वाकसे सर, श्री सुरवसे सर, श्री पवार सर, मधुस्मृती अकॅडमीचे संचालक श्री संदीप कुलकर्णी सर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या सर्वांचा मी व्यक्तीश: आभारी आहे.

आपल्या क्लासेसच्या सहशिक्षीका कु. विदया मॅडम, अमीत डोंगरे, ज्ञानेश्वर कांबळे यांचे पण अनमोल सहकार्य आहे.

क्लासेसला ज्यांचे आशिर्वाद मिळाले असे ठेसे परिवार, राचटटे परिवार शिरीषजी उटगे तसेच प्रा. युवराज हालकुडे सर, प्रा. शिवानंद तोडकरी, प्रा. धोंडीराम गंगापुरे यांच्या मार्गदर्शनाशिवाय क्लासेसचा प्रवास अपूर्णच राहिल. सुरूवातीला वेळोवेळी प्रश्नपत्रीका, नोटस, जाहिरात तयार करून देणारे श्री जनार्दन काळे, श्री विनय पिंगळे,

श्री पाठक साहेब, श्री सचिन इळेकर, श्री सिंदुरे साहेब यांचापण क्लासेसला लागलेला हातभार विसरू शकत नाही.

शेवटी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे पाठीवर थाप मारून सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचा शतश: ऋणी आहे. हाच आशिर्वाद व मार्गदर्शन सदैव आमच्या डोक्यावर राहावा हिच ईश्वर चरणी विनम्र प्रार्थना.

आपला

**श्री गंगापुरे माधव कचरू**

**संचालक,** गंगापुरे Maths क्लासेस, औसा

# श्री माधव गंगापुरे सर



अस म्हणतात की प्रत्येक व्यक्ति मोठी बनु शकते. कारण दुसऱ्याची सेवा करणं, मदत करणं व योग्य मार्गदर्शन करणं हे प्रत्येकाच्या हातात आहे. त्यासाठी तुम्हांला कॉलेजची डिग्री मिळवावी लागत नाही. ज्यांची सेवा करायची आहे. त्यांच्याकडून परवानगी घ्यावी लागत नाही. गरज असते ती फक्त सेवाभावी हृदयाची, प्रेमभावनेने जागृत झालेल्या आत्म्याची, मोठ्या मनाची. अशी माणसं आपल्या अवती - भवती नक्कीच असतात, गरज असते ती अशी माणसं शोधून काढण्याची अशाच सेवाभावी हृदयाचा, स्वभावाने प्रेमळ, जागृत असलेला व मोठ्या मनाचा माझा एक मित्र आहे. त्याचे नाव आहे श्री माधव काचरू गंगापुरे सर.

श्री गंगापुरे सर हे औसा शहरात गणित या विषयाचे शिकवणी वर्ग चालवतात. गंगापुरे क्लासेस यावर विद्यार्थी व पालक वर्गांमध्ये मोठा विश्वास आहे. फक्त विद्यार्थी व शिकवणी एवढाच विषय मर्यादित न ठेवता गंगापुरे सरांनी विद्यार्थ्यांशी एक वेगळं भावनिक नातं या ठिकाणी निर्माण केलं आहे. नियमीत शिकवणी वर्ग घेणे, प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे, त्यांची हजेरी नोंद ठेवणे, सराव परिक्षा घेणे त्यात मिळवलेले गुण व प्रगती पालक वर्गा पुढे ठेवणे व त्यात प्रगतीच्या दृष्टिने पालकांना व विद्यार्थी यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे या व अशा अनेक वेग-वेगळ्या कल्पक उपाय योजनामुळे श्री गंगापुरे सर यांनी आपलं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे हे निश्चीत. आज गंगापुरे क्लासेस ही [illegible] मोठया दिमाखात उभी आहे. पण इथपर्यंत पोहचण्याचा श्री गंगापुरे सर यांचा प्रवास थक्क करणारा आहे. हा प्रवास एका जिद्दीचा आहे. हा प्रवास एका संघर्षाचा आहे.

गंगापुरे सर यांचे नाव माधव काचरू गंगापुरे असे आहे. त्यांचा जन्म २७ जुलै १९८१ मध्ये चाकुर तालुक्यातील आटोळा या गावी झाला. त्यांचे बालपण अतिशय अत्यंत बिकट व हलाखीचे. आई - वडील अतिशय कष्टी व काबाडकष्ट करणारे कधी मोल-मजुरी, कधी दुसऱ्याच्या शेतात तर कधी मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करीत. अशा कठीण काळात ते आपल्या मुलाला शिक्षण कसे देऊ शकणार हा त्यांच्या पुढे फार मोठा प्रश्न होता. मुलांची तर शिक्षण घेण्याची फार इच्छा होती. आपण खुप शिकाव , मोठं व्हाव अशी स्वप्न गंगापुरे सर पाहात होते. पण परिस्थिती अत्यंत बिकट होती.

अस म्हणतात की जिथे इच्छा असते, तेथे मार्ग असतोच. त्यासाठी आपण थोडा धीर ठेवला पाहिजे. आपल्या स्वप्नावर ठाम असले पाहिजे. गंगापुरे सरांचेही असेच झाले. त्यांची शिक्षणाबद्दलची आवड व तळमळ लक्षात घेवून , गंगापुरे सर यांचे आजोबा श्री प्रभुप्पा देवंग्रे हे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी सरांचे शिक्षण कार्य करण्याचे व त्यांना शिकविण्याचा भार, जबाबदारी स्वीकारली. गंगापुरे सर यांच्या आयुष्यात आजोबा प्रभुप्पा हे खऱ्या अर्थाने 'प्रभु' ठरले.

गंगापुरे सर यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिरुर अनंतपाळ येथे पुर्ण झाले. पुढील उच्च शिक्षण दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे चालु झाले. स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठातून M.A. चे शिक्षण घेत आहे. अध्यापन शास्त्रातील B.Ed ही पदवी लातूर येथील केशरबाई काळे अध्यापक महाविद्यालय येथून प्राप्त केली. या संपुर्ण काळात त्यांनी आपलं लक्ष अभ्यासावर केंद्रीत केले होते. यातूनच ते आपलं शिकण्याचं स्वप्न साकार करीत होते.

२००४ साली गंगापुरे सर नोकरीच्या शोधात प्रथम औसा येथे दाखल झाले. एका खाजगी संस्थेत त्यांनी एक वर्ष नोकरी ही केली. पण फार काळ त्यांच मन त्या ठिकाणी रमेना. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र, प्रभावी काही तरी आपण वेगळं करावं असं ते सतत विचार करीत होते. याच विचाराच्या प्रभावाने प्रभावीत होवून त्यांनी चक्क नोकरीला राम-राम केला. नोकरी तर सोडली, परिस्थिती कठीण, स्वस्त बसुन तर भागणार नाही, काही तरी केलच पाहिजे म्हणून सुरुवातीला गंगापुरे सर यांनी इयत्ता पहिली ते चौथी च्या मुलांसाठी शिकवणी वर्ग सुरु केले. त्या वेळी विद्यार्थी संख्या होती ८ ते १०. २००६ साली पहिल्यांदा १३ ते १५ विद्यार्थी घेऊन त्यांनी स्वतंत्रपणे गणित या विषयाच्या शिकवणी वर्गाची सुरुवात केली. अतिशय चिकाटीने, प्रामाणिकपणे, जिद्दीने आपल्या शिकवणीच्या माध्यमातून ते आपल्या विद्यार्थ्यांना अभ्यासपुर्ण असं मार्गदर्शन करीत. यामुळे त्यांच्याकडे विद्यार्थी संख्या वाढू लागली. जशी जशी विद्यार्थी संख्या वाढू लागली तशी-तशी सरांना जागेची अडचण भासु लागली. आपली स्वतःची स्वतंत्र जागा घेणे आता गरजेचे होत. अतिशय कष्टातुन सरांनी औसा शहरात स्वतःची वेगळी जागा घेतली. याच ठिकाणी आज गंगापुरे क्लासेस भरतात.

आज घडीला गंगापुरे सर यांच्याकडे जवळपास ३५० विद्यार्थी अतिशय विश्वासाने शिकवणीसाठी येतात. १० ते १२ विद्यार्थी घेऊन सुरु केलेली शिकवणी आज १० वर्षात ३५० पर्यंत पोहचली आहे. ही मोठी कौतुकाची बाब आहे. पण या पाठीमागे तेवढेच मोठे परिश्रम व सातत्य आहे हे विसरुन चालणार नाही. आपल्या शिकवणी वर्गाची निकालाची उज्वल परंपरा ही त्यांनी कायम ठेवली आहे. पैकीच्या पैकी गुण घेणारे अनेक विद्यार्थी त्यांच्या क्लासेसमध्ये आहेत. बघता-बघता गंगापुरे क्लासेस ने दहा वर्ष पुर्ण झाली आहेत. आज याचे औचित्य साधुन श्री गंगापुरे सर आपल्या शिकवणी वर्गाचे दशकपुर्ती महोत्सव साजरा करीत आहेत. आपण आयुष्य जगत असताना आपले कोणीतरी आदर्श असतात, कोणीतरी मार्गदर्शक असतात, त्यांच्यामुळेच आपल्याला जगण्यासाठी एक ऊर्जा मिळत असते. गंगापुरे सर यांचे श्रध्दास्थान, प्रेरणास्थान म्हणजे त्यांचे आजोबा श्री प्रभुअप्पा देवंग्रे हे होय, आपल्याला आपल्या आजोबांचे सतत स्मरण रहावे यासाठी त्यांनी आपल्या घराला प्रभु-कुंज असे नाव दिले आहे. यातच सरांची आजोबा प्रति श्रध्दा व आस्था दिसुन येते.

श्री गंगापुरे सर यांना वाचनाची विशेष आवड आहे. फावल्या वेळी मनसोक्त वाचन करणे हा त्यांचा छंद आहे. बुध्दीबळ हा खेळ त्यांना प्रिय आहे. गणित हा तर त्यांचा अतिप्रिय विषय. गणित या विषयातील अद्ययावत अशी माहिती ते सतत संकलित करत असतात. विद्यार्थी वर्गामध्ये गणित या विषयी आवड निर्माण करण्याचा ते सातत्यपुर्वक प्रयत्न करीत असतात. सरांना अभियंता होण्याची खुप इच्छा होती. पण आपली ही इच्छा आपले अनेक विद्यार्थी अभियंता निर्माण करण्याच्या माध्यमातून ते पुर्ण करीत आहेत.

अशा या ध्येयवेड्या, मेहनती, अभ्यासु व प्रेमळ मित्रास आयुष्याच्या पुढील वाटचालीस मनपुर्वक खुप - खुप हार्दिक शुभेच्छा.

- प्रा. युवराज हालकुडे सर

दशकपुर्ती सोहळा

# शिकवले जिथे..... शिकले जिथे .... ते माझे Gangapure Coaching क्लासेस



मी डॉ. सुप्रिया जोतीराम टिके याच क्लासमध्ये शिकले. सन २००६-०७ साली याच क्लासची विदयार्थीनी होते आणि यादरम्यान मला श्री गंगापुरे सरांचे मार्गदर्शन मिळाले याचा मला सार्थ अभिमान आहे. माझे डॉक्टर होण्याचे लहाणपणापासुनचे स्वप्न आज पुर्ण झाले, यात या क्लासेस चा आणि सरांचा सिंहाचा वाटा आहे.

Really Thank you so Much, Sir.

मित्रांनो यशस्वी होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते. त्यासाठी कष्ट, परिश्रम व जिदद पणाला लावावी लागते. तेंव्हा स्पर्धेत उतरताना महत्वकांक्षी असणे जरूरीचे आहे. आणि या सर्वांसाठी योग्य ते मार्गदर्शन हे हवेच, जे मला या क्लासेस कडुन व माझ्या आई-वडिलांकडुन मिळाले.

या क्लासेसमुळे मला बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. फक्त अभ्यासाबददलचं नाही तर ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असेलेले सर्व मार्गदर्शन मला सरांकडून मिळत गेले. त्यामुळेच लहाणपणापासुनचं माझ्या मध्ये असलेली डॉक्टर होण्याची चिकाटी, जिदद आतिण माझं स्वप्न Refresh होत गेलं.

सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्व, विदयार्थीप्रिय अभ्यास, दुरदृष्टी लाभलेल्या गंगापुरे सरांच्या कार्याचा आलेख नेहमी चढता राहिला. सामाजिक जाणिवेतुन गरिब व होतकरू विदयार्थ्यांना सर मायेचा आधार देतात. विदयार्थ्यांना प्रोत्साहन देणे, विदयार्थ्यांच्या Difficutties Solve करणे, यामुळे ते सतत विदयार्थ्यांच्या गराडयामध्ये पहावयास मिळतात. सरांचा स्वभाव साधा, सरळ, मितभाषी असल्यामुळे खऱ्या अर्थाने ते विदयार्थ्यांचे चाहते बनले. गरिबातील गरिब विद्यार्थी असो वा खोडया करणारा विदयार्थी असो, सर त्यांना तितक्याच सहृदयतेने बोलुन आपलेसे करतात, हा सरांचा मोठेपणा...

आमच्या बॅचपासुनच या क्लासेसमध्ये इ. १० वी चे वर्ग सुरु झाले. तो सरांचा पहिलाच Attempt होता आणि तो शेवटी Successful ही ठरला. मलपा अवघड वाटणारा गणित विषय सरांनी अतिशय सोपा करून शिकवला. त्यामुळेच मला गणित विषयांविषयी आवड निर्माण झाली. त्याचबरोबर इतर विषयांविषयी मला सरांकडून अनमोल मार्गदर्शन मिळत गेले. आणि मी त्या दिशेने कष्ट पण घेतले. त्यामुळेच इ. १० वी तमी हवेतेवढे यश प्राप्त करू शकले. सरांनी दिलेलं मार्गदर्शन मला केवळ १० वी पुरतेच नाही तर माझ्या पुढील Acadamic Years मध्ये मोलाचे ठरले. त्यांनी दिलेला यशाचा मंत्र मी आजही पाळते आणि त्याच मार्गावर चालते.

मित्रांनो केवळ विचार करून भागत नाही, तर विचारांचे रूपांतर कार्यात व्हायला हवे. मग आपोआपच इच्छीलेली फलप्राप्ती आपल्यासमोर दिसते व आपण जिवनात यशस्वी होतो. जिवण दुसरं तिसरं काहीही नसुन संघर्षाचा झरा आहे. तो खाचखळगे, दगडधोंडे, अडथळे पार करून सागराला जाऊन मिळतो व महासागर बनतो.

या क्लासेसची अशीच उत्तरोत्तर प्रगती होऊन या स्पर्धेच्या गगणात त्यांच्या तेजस्वी ताऱ्यांची संख्या आम्हा विदयार्थ्यांच्या रुपाने वाढत रहावी, हिच सदिच्छा.

- डॉ. सुप्रिया जोतीराम टिके
(M.B.B.S.)

## मनोगत....



मी १० वी ला गंगापुरे Maths क्लासेस मध्ये शिकत होते आणि त्यामुळेच मी गणितात तालुक्यात प्रथम येऊ शकले.

गंगापुरे सरांची शिस्त, सरांच पुस्तकातील प्रत्येक भाग व्यवस्थित शिकवणे, दर रविवारी होणाऱ्या परीक्षा, HOTS प्रश्नांची तयारी, शिकवलेल्या प्रत्येक भागावर rivision इतकेच नाही तर कोणत्याही पुस्तकातील विचारलेला कोणताही प्रश्न सर सोडवून दाखवत. त्यामुळे प्रत्येक विदयार्थ्यास मी गंगापूरे Maths Classes मध्येच Tution लावण्यास सल्ला देईल. गणित हा विषय फक्त १० वीलाच नाही तर पुढे ११ वी व १२ वीलाही तितकाच महत्वाचा आहे. १० वीला गणिताचा पाया पक्का झाल्यामुळे त्याचा फायदा ११ वी व १२ वी Physics मध्ये झाला.

So, According to me,
Gangapure Coaching Classes is one of the best classes in Maharashtra.

सरांना दशकपुर्तीच्या हार्दिक शुभेच्छा...!

**- परतेवार निशा**
**M.B.B.S. Appear**

## मनातल थोड फार...

मी, कांबळे कविता रंगनाथ. सन २०१३-२०१४ सालची सरांची विद्यार्थीनी. लहान पणापासुन ते ८ वी पर्यंत गणिताचे धडे मला माझ्या पप्पांकडूनच मिळाले मात्र त्यानंतर गणित अगदी मायेने, सहजतेने, आणि सोप्या रितीने शिकवणारे गंगापुरे सर भेटले.

लिहाव त्यांच्याविषयी,
शब्दही आनंदी होती बापुडे.
बोलावं त्यांच्या विषयी,
प्रशासनही झुकेल ज्यांच्यापुढे.

खरंच ! अगदी वरील काव्यपंक्तीप्रमाणेच आपल्या सर्वांचे प्रिय गंगापुरे सर आहेत, कविता, तु हे करु शकतेस You can do it आत्मविश्वासात्मक शब्द अगदी मनात रूजायचे आणि आत्मविश्वास वाढायचा. आजही फिजीक्सचे सर समोर शिकवत असताना हळुवार मनात येऊन जातं की, हा Concept गंगापुरे सरांनी अगदी छान शिकवला असता. आणि मग मित्र-मैत्रीणीत चर्चा झाली की, परत त्या आठवणी जणु ताज्या व्हायला लागतात.

शिस्त आणि आपल्या कार्याला निष्ठेने पार पाडणे, या दोन गोष्टी मी या क्लासेस कडून शिकले. सातत्याने दर रविवारी होणाऱ्या परिक्षा, परिक्षेत मार्क्स कमी आले की, सरांकडून मिळणारा दिलासा आणि मार्क्स जास्त आले की, पाठीवर मिळणारी शाबासकी मला आजही आठवतेय.

या क्लासेस विषयी आणि सरांविषयी लिहितच रहावं असे वाटतयं. पण कुठेतरी थांबा घ्यावाच लागतो.

सरांना दशकपुर्तीच्या हार्दिक शुभेच्छा...!

**- कु. कांबळे कविता रंगनाथ**

## ज्ञानार्जनासाठी क्लासेस पुरकच :

आजचे युग हे ज्ञानाचे युग आहे आजच्या आधुनिक काळात प्रचंड स्पर्धा आहे. ज्ञानार्जनासाठी अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. या जिवघेण्या स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांना त्या त्या विषयाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परिपुर्ण करण्याचा चांगला प्रयत्न होता दिसून येत आहे. आणि त्यामुळेच क्लासेस एक समांतर व्यवस्था म्हणून टिकून आहेत.

गंगापुरे सरांनी १० वर्षापुर्वी गणित क्लासेस एका छोटयाश्या जागेत सुरु केले गणितासारख्या अवघड विषयाला सोपे करून शिकवणे यात त्यांचा हातखंडा असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लवकरच लोकप्रिय झाले. प्रत्येक वर्षी त्यांच्या क्लासमधून अनेक विद्यार्थी मेरीट मध्ये येतात. त्यांचा सत्कारही क्लासेसच्या माध्यमातून केला जातो. आणि आज त्या छोटयाश्या रोपटयाचे वटवृक्ष तयार झाले आहे. त्याचा गणितात **गंगापूरे पॅटर्न** म्हणून अल्पावधीतच ब्रँड तयार झाला आहे. नावलौकिक झाले आहे.

भविष्यातील त्यांच्या वाटचालीस व प्रगतीस मन:पुर्वक शुभेच्छा



**डॉ. सुनिल चव्हाण**
**संजीवनी हॉस्पिटल**
बालरोग चिकित्सक

## 'Revolutionary Movement'

"The will to win, the desire to succeed, the urge to reach your full potential... these are the keys that will unlock the door to personal excellence."

Congrats ! Successfully completed 10 years !! Since 10 years, I have been seeing your marvelous teaching. I know you are the best Mathematician. "Teaching is a noble profession". You are a noble and dedicated teacher. Your class is a **Milestone** in Ausa city.

Due to your hard work and perseverance, you have created an **'Renowned History'** in this holy education field.

May God prosperous for your **'Revolutionary Movement'** in education. Wish you best of luck for your further progress.

**Wakse Sir**
Wakse's Gurukul English Academy,
Ausa

## अभिप्राय...

**गंगापुरे सर विद्येचा वारसा, आहेत ज्ञानाचा आरसा**
**असे गुरू ज्ञानदाता, जीवनी गुरू विधाता**

विजेते वेगळया गोष्टी करत नाहीत. ते प्रत्येक गोष्टी वेगळया पध्दतीने करतात. गंगापूरे कोचिंग क्लासेसची ही शिकवण आमच्या मनोमनी ठसली आहे. सर आमचे भग्यविधाते आहेत. आमच्या अभ्यासाबरोबरच आमचे नैतिक मुल्य व संस्कार जपण्यात सर यशस्वी ठरले.

**गुरूवीण नाही दुजा आधार, एकला, अकला तोच नेतसे पार**
**आयुष्याची पेठ, संसाराचे ताट**
**गुरूवीण वाट कैची रथा**

खरंच सरांनी आम्हाला ज्ञानचक्षू दिला आहे. गंगापूरे क्लासेसमध्ये पाऊल ठेवल्यानंतरच माझे जीवनच पालटले. माझी गणित ही एक अडचण होती मी गणितात उत्तीर्ण होईल अस मला कधीच वाटल नाही. मात्र गंगापूरे सर लाभले अन् सुकलेल्या कळीला पाणी मिळून बहर आला.

मी मानते की, जीवनरूपी सागर मंथनात गंगापुरे कोचिंग क्लासेस जहाज आहे, जिच्यात बसल्यास आपण यश गाठू शकतो. सर नेहमी म्हणतात उचित ध्येयाच्या दिशेने उदिदष्टयपूर्तीकडे होणारी वाटचाल म्हणजे यश हे यश मिळवून देण्यात सरांचा सिंहाचा वाटा आहे.

मी कुठल्याही क्षेत्रात असले तरी सरांना कधीच विसरणार नाही.

**अशी पाखरे येती**
**आणिक स्मृती ठेवून जाती**

आमच्यासारखे अनेक विद्यार्थी सरांना लाभतील परंतू ही चंदनाची मुर्ती सतत झिजून दुसऱ्यांना सुगंध देत राहील. आता कातरक्षणी मन हळवे झाले आहे, म्हणतात ना,

**सुर्य मावळला तरी संधी प्रकाश मागे राहतो**
**सहवास संपला तरी, आठवणींचा सुगंध मागे राहतो**

या प्रमाणे आम्ही कोठेही असलो तरी गंगापुरे सरांचा मार्गदर्शक आरसा आमच्या पाठीशी असेल

Sir, I thanked you, I thank you and I will thank you from the bottom of my heart.

**- पुनम देविदास कुलकर्णी**

## अभिप्राय...

मनुष्य के भावी जीवन का अधार उसे बाल्यकाल के संस्कार और चारित्र्यनिर्माण पर निर्भय करता है । बच्चे आगे चलकर नेताजी सुभाषचंद्र बोस जैसे विरों, एकनाथजी जैसे संत महापुरूषों तथा श्रवण कुमार जैसे मातृपितृभक्तों के जीवन का अनुसरण करके सर्वांगीण उन्नती कर सके, इस हेतू बच्चों मे उत्तम संस्कार का सिंचन बहुत आवश्यक है ।

हसते खेलते बच्चें मे शुभ संस्कारो का सिंचन किया जा सकता है.। नन्हा बालक या विद्यार्थी कोमल पौधे की तरह होता है, उसे जिस और मोडना चाहे, मोड सकता है. वैसे अच्छे मार्गदर्शन की जरूरी होती है. यही मार्गदर्शन गंगापूरे कोचिंग क्लासेस के माध्यम से दिया जा रहा है. बच्चों मे अगर बचपन से ही शुभ संस्कारों का सिंचन किया जाए तो आगे चलकर वे बच्चे विशाल वटवृक्ष के समान विकसीत होकर भारतीय संस्कृती के गौरव की रक्षा करने मे समर्थ हो सकते हैं ।

विद्यार्थी भारत का भविष्य विश्व का गौरव व आपने माता-पिता की शान है उसके अंदर सामर्थ्य का असीम भंडार छुपा हुआ है. उसे प्रकट करने हेतू आवश्यक है सुसंस्कारो का सिंचन, उत्तम चारित्र्य निर्माण और भारतीय संस्कृती के गौरव का परिचय । आदरणिय, वंदनिय गंगापुरे (सर) गुरूजन व्दारा समय समय पर इन्ही विषयों पर प्रकाश डाला गया है । उसी के आधार पर सरल सुबोध शैली मे विद्यार्थीपयोगी सामग्री का संकलन करके गंगापुरे कोचिंग क्लासेस नाम दिया गया हैं । यह क्लासेस विद्यार्थीयों के लिए उपयोगी सिध्द होगी, ऐसी आशा है ।

**- युवराज बालगीर**

दशकपुर्ती सोहळा

# गणिताच्या मुलभूत संकल्पना अगदी पक्क्या म्हणजेच गंगापुरे क्लासेस ...



औसा शहरात माध्यमिक शालेय वर्गाच्या गणित अध्यापन क्षेत्रात मागिल १० वर्षापासून एखादया दिपस्तंभा सारखे कार्यरत असणारी एक खाजगी शैक्षणिक संस्था म्हणजे गंगापूरे मॅथ्स् क्लासेस.

एखादया शहराच्या शैक्षणिक उत्कर्षा मध्ये दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळा व महाविद्यालयांसोबतच त्यांच्या कार्यास पुरक ठरणाऱ्या खाजगी कोचिंग क्लासेसचे महत्व आता सिध्द झाले आहे. निव्वळ व्यावसाईक दृष्टिकोन न ठेवता सेवाभावाने केलेला व्यवसाय अल्पावधितच यशस्वी होतो हे गंगापुरे मॅथ्स क्लासेसचे संचालक श्री माधव गंगापुरे सरांनी दाखवून दिले आहे.

सन २००६ साली गंगापुरे सरांनी औशयामध्ये जेमतेम ५-७ विद्यार्थ्यांना घेवून गंगापुरे क्लासेस ची स्थापना केली. १० वीच्या पहिल्याच बॅचच्या निकालातून त्यांनी त्यांचे वेगळे पण सिध्द केले. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांना १५० पैकी १५० गुण मिळाले व पुढे निकालाची परंपरा अव्याहत पणे चालू आहे. निकाल देण्याचे हे सातत्य सहज प्राप्त होणारी बाब नाही. सखोल विषय ज्ञान, विषय मांडण्याची योग्य पध्दत, नियमितता हे गुण असल्या खेरीज हे शक्य होत नाही. शिक्षणाचा उत्कृष्ण दर्जा, तत्पर सेवा व निकालाचे सातत्य या जोरावर गंगापुरे सरांनी अल्पावधितच शहरातील शैक्षणिक क्षेत्रात मानाचे स्थान मिळवले.

माध्यमिक शिक्षण हा उच्च शिक्षणाचा पाया आहे. ८ वी ते १० वी चा अभ्यास आपल्या करीअर ची दिशा ठरवतो. एखाद्या विद्यार्थ्यांवर या वर्गामध्ये झालेले शैक्षणिक संस्कारच त्याच्या / तीच्या उच्च शिक्षणाची गती ठरवतात. सरांचे अनेक विद्यार्थी आज मेडिकल व इंजिनीअरींग क्षेत्रात कार्यरत आहेत अथवा शिक्षण घेत आहेत. त्यांच्या या यशामध्ये माध्यमिक शिक्षणाचा पाया अतिशय महत्वाचा आहे जो मजबूत करण्याचे काम गंगापूरे सरांनी मोठ्या जिददीने केले आहे.

मागिल १५ वर्षापासून मी या खाजगी कोचिंग क्लासेसच्या क्षेत्रात काम करत आहे. दरवर्षी त्यांच्या कडे १० वीला शिकलेले अनेक विद्यार्थी माझ्याकडे १२ वी गणित व भौतिक शास्त्र या विषयांसाठी क्लासला येतात. गंगापूरे सरांचा विद्यार्थी म्हणजे त्याच्या गणिताच्या मुलभूत संकल्पना अगदी पक्क्या... हा अनुभव मी मागील अनेक वर्षापासून घेत आहे. अश्या विद्यार्थ्यांना शिकवणे हा आमच्या एक आनंददायक अनुभव असतो. एका अर्थाने आमचे काम सोपे करण्याचे काम गंगापुरे सर करत आहेत असे म्हंटले तर त्यात काही वावगे होणार नाही.

माझा व गंगापूरे सरांचा परीचय ८-९ वर्षाचा आहे परंतु जवळीक मागील ५-६ वर्षापासूनची.... अतिशय सुस्वभावी, शांत व विनम्र माणूस. आपण भले आपले काम भले हि मानसिकता. पहिले महत्व आपल्या कामाला. त्यांच्या - माझ्या अनेक बाबतीत साम्य असल्याने जवळीकतेचे रूपांतर मैत्रित व्हायला वेळ लागला नाहील. या निमीत्ताने मला एक चांगला मित्र मिळाल्याचे समाधान वाटते. अशा या माझ्या सुस्वभावी मित्रास, त्यांच्या क्लासेसच्या दशकपुर्ती निमीत्त व पुढील वाटचाली साठी खुप खुप शुभेच्छा.

**प्रा. संदिप कुलकर्णी**
**संचालक,**
मधुस्मृती अॅकॅडमी, औसा



इ. स. २०१५ - १६ इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या
निरोप समारंभ प्रसंगी विद्यार्थी व गंगापुरे सर

मा. श्री गंगापूरे सर

स.न.वि.वि.



यावर्षी आपण आपल्या कोचिंग क्लासेसचा दशकपूर्ती सोहळा साजरा करीत असल्याचे समजले. आपणास हार्दिक शुभेच्छा.

१० वर्षापूर्वी औश्या सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी जीवघेण्या शैक्षणिक स्पर्धेत टिकून राहावा यासाठी आपण चालू केलेले शैक्षणिक उपक्रमाचं रोपटं आज वटवृक्ष झाला आहे. औसा शहरातील शैक्षणिक वातावरण वाढीसाठी आपण केलेले प्रयत्न कौतूकास्पद आहेत. आपल्या कोचिंग क्लासेसचे विद्यार्थी राज्यात अनेक क्षेत्रात नावलौकीक करीत आहेत याचा आपल्या सोबत मलाही अभिमान आहे. आपले शैक्षणिक कार्य असेच पुढे चालत रहावे. आपली प्रगती व्हावी. आपल्या प्रगतीतून औसा शहराची प्रगती होत रहावी ही सदिच्छा.

आपला

संजय सगरे
अध्यक्ष, औसा तालुका पत्रकार संघ, औसा.



इ. स. २००६ चे इयत्ता १० वी च्या विदयार्थ्यांचा निरोप समारंभ



इ. स. २०१० च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी गंगापूरे सर व चव्हाण सर



इ. स. २००८ च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ सोहळा सोबत गंगापूरे सर



इ. स. २०१२ च्या इ. १० वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ



इ. स. २००९ च्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी गंगापूरे सर



इ. स. २०१४ च्या इ.१० वी च्या विदयार्थ्यांचा सत्कार प्रसंगी

दशकपूर्ती सोहळा



इ. स. २०१५ च्या इ. १० वीच्या गुणवंत विदयार्थ्यांचा सत्कार समारंभ



इ. स. २०१५ च्या इ. १०वीच्या सत्कार समारंभ प्रसंगी
प्रा. गंगापूरे डि एल व गंगापूरे सर



चि. घोडके शुभम व कु. काळदाते प्रिती यांचा पालका समवेत
सत्कार करताना गंगापूरे सर



इ. स. २०१५ च्या इ. १० वीच्या सत्कार समारंभ प्रसंगी
प्रा. गंगापूरे सर व चव्हाण सर



इ. स. २०१५ च्या इ. १० वीच्या गुणवंत विदयार्थ्यांचा सत्कार समारंभ



गुणवंतांचा सत्कार करताना गंगापूरे सर

सोहळा



प.पू.म.१०८ शांतवीर शिवाचार्य महाराजांचा स्वागत करताना



भादयाचे सुपूत्र व आमचे मित्र श्री रविकीरण उबाळे यांची IAS पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना गंगापुरे सर



माजी आ. वैजनाथ दादा शिंदे यांची क्लासेसला सदिच्छा भेट प्रसंगी त्यांचे स्वागत करताना गंगापुरे सर



आमचे आदरणीय पालक श्री देविदासराव कुलकर्णी गंगापुरे सरांचा सत्कार करताना



कालीदासराव माने सर यांची क्लासेसला सदिच्छा भेट



प्रा. संतोष शिंदे ...



क्लासेसचे उद्घाटन करताना प्रा. काशिनाथ सगरे सर



क्लासेसची विद्यार्थीनी कु.निशा पतेवार चा M.B.B.S ला प्रवेश मिळाल्याबद्दल सत्कार करताना गंगापूरे सर



कु. अंजली डाकळे व कांबळे कविता यांना गणितात १०० गुण मिळाल्याबद्दल सत्कार करताना गंगापूरे सर



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभा प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सोमनाथ कांबळे सर



क्लासेसची विद्यार्थीनी डॉ. सुप्रिया टिके यांची क्लासेसला सदिच्छा भेट प्रसंगी स्वागत करताना गंगापूरे सर

# इ.स. २००८ चा विद्यार्थी - पालक मेळावा






व्यासपिठावर मोरे सर, कनाडे सर, जगलपुरे सर, नामदेव खंडगावे सर, युवराज बालगीर सर, महादेव जंगाले सर





विद्यार्थ्यांचा सत्कार करताना श्री जगलपुरे सर, मनोगत व्यक्त करताना गंगापुरे सर, क्लासेसची विद्यार्थीनी कु. पुनम कुलकर्णी




मनोगत व्यक्त करताना क्लासेसची विद्यार्थीनी कु. सुप्रिया टिके व उपस्थित विद्यार्थी व पालक




इ.स. २००९ च्या पालक मेळाव्या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना गंगापुरे सर



इ.स. २००९ च्या पालक मेळाव्या प्रसंगी उपस्थित पालक व विद्यार्थी



क्लासेस तर्फे आयोजित योग - प्राणायाम शिबीरास उपस्थित विद्यार्थी व पालक



प्रा. नारनवरे सर मार्गदर्शन करताना व्यासपिठावर लोंढे सर, थत्ता ठेसे, कुलकर्णी सर, पाटील बाळासाहेब



पालक मेळाव्या प्रसंगी उपस्थित पालक व विद्यार्थी



क्लासेसचा आकलुज येथे शैक्षणिक सहलीचा प्रसंग


दशकपूर्ती सोहळा














बदलत्या शैक्षणिक


गंगापूरे कोचिंग क्लासेस, औसा
प्रवेश चालू
विषय
गणित


Gangapure
गंगापूरे MATH'S क्लासेस ने
घडविला रिझल्टचा इतिहास...


गंगापूरे MATHS' क्लासेसने
पुन्हा एकदा घडविला रिझल्टचा इतिहास...


गंगापूरे MATH'S क्लासेस


गंगापूरे Maths' क्लासेस


Gangapure
गंगापूरे
Maths क्लासेस


गंगापूरे Maths' क्लासेस

दशकपूर्ती सोहळा

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **सन २००६** | | | |
| १ | कु. टिके सुप्रिया | १२६ | ८४.६६ |
| २ | कु. चेंडकाळे सुचिता | ११४ | ८३.३३ |
| ३ | कु. शेख अफ्रीन | ११८ | ८०.२६ |
| ४ | कु. मोरे. ज्योती | ११८ | ७९.०० |
| ५ | कु. कदम भाग्यश्री | ११२ | ७५.६६ |
| ६ | कु. वाघमारे वर्षा | ११२ | ७४.५३ |
| **सन २००७** | | | |
| १ | कु. अंबुलगे अनघा | १४० | ७८.३३ |
| २ | कु. गुडले अमृता | १३८ | ८०.९२ |
| ३ | कु. सुर्यवंशी विजया | १३५ | ७९.२३ |
| ४ | चि. टिके पंकज | १३२ | |

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **सन २००८** | | | |
| १ | चि. गवळी अनिल | १४९ | ९३.३८ |
| २ | कु. वैजवाडे शितल | १४९ | ८४.७१ |
| ३ | कु. कुलकर्णी पुनम | १४८ | ८८.७१ |
| ४ | चि. मुल्ला इकबाल | १४८ | ९३.५३ |
| ५ | कु. भिसे साधना | १४७ | ८९.०७ |
| ६ | कु. बुटटे अपेक्षा | १४७ | ८२.९२ |
| ७ | कु. कदम मोहिनी | १४२ | ८८.०० |
| ८ | कु. चंदेल पुजा | १४१ | ८५.५२ |
| ९ | कु. विभुते सायली | १४० | ८५.६९ |
| १० | चि. मुंगळे विक्रम | १४० | ९२.१५ |
| ११ | कु. उटगे शरयू | १३८ | ८२.७६ |
| १२ | चि. मुल्ला एजाज | १३८ | ८१.७३ |
| १३ | कु. जगलपुरे आसमा | १३७ | ८५.३७ |

**सन २००९**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चि. टिके सुरज | १४२ | ८३.०७ |
| २ | चि. कुर्ले निखील | १४१ | ८४.१५ |
| ३ | चि. जाधव हेमंत | १४० | ८०.७६ |
| ४ | चि. जाधव अमर | १४० | ८८.३० |
| ५ | चि. जाधव संदिप | १३१ | ९१.५३ |
| ६ | कु. राचटटे स्वाती | १२१ | ८४.४६ |
| ७ | चि. कांबळे राजकिरण | १२८ | ८८.१५ |
| ८ | कु. रिंगणकर संजीवनी | ११३ | ८२.१५ |
| ९ | चि. राचटटे निशांत | ११३ | ७९.२३ |

**सन २०१०**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चि. शिंदे गजानन | १५० | ९५.८२ |
| २ | चि. बिराजदार श्रीकांत | १५० | ९३.४५ |
| ३ | चि. शिंदे रोहित | १५० | ९५.२७ |
| ४ | चि. काळदाते नितीन | १५० | ९१.४५ |
| ५ | चि. काझी कामेल | १४१ | ८८.३६ |
| ६ | कु. अर्पसिंगेकर नेहा | १४७ | ८०.१८ |

**सन २०१०**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कु. बुरकुले वंदना | १४३ | ८७.८२ |
| २ | चि. उटगे आकाश | १४२ | ८४.७३ |
| ३ | कु. वाघमारे रोहिणी | १४१ | ९१.४५ |
| ४ | चि. कांबळे विजय | १४० | ८८.५५ |
| ५ | कु. कांबळे सुप्रिया | १४० | ७१.३६ |
| ६ | कु. मिटकरी सपना | १३७ | ८३.२७ |

**सन २०११**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कु. अर्पसिंगेकर पल्लवी | १५० | ९१.४५ |
| २ | कु. मलिशे श्रेया | १४१ | ९१.४६ |
| ३ | कु. विभुते प्राजक्ता | १४१ | ९०.०० |
| ४ | चि. काटे सुरज | १४१ | ८८.११ |
| ५ | कु. दुरुगकर स्नेहा | १४८ | ९०.०० |
| ६ | कु. पाटील अश्विनी | १४८ | १००.०० |
| ७ | कु. मुसांडे प्रिया | १४७ | ९५.८२ |
| ८ | कु. घोडके सुकन्या | १४६ | ८६.०० |

दशकपूर्ती सोहळा

| सन २०११ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
| ९ | चि. उटगे मुक्तेश्वर | १४६ | ८२.०० |
| १० | कु. माने माया | १४५ | ९०.३६ |
| ११ | चि. शेख अखलाख | १४४ | ७२.०५ |
| १२ | कु. ताकभाते शिवानी | १४३ | ८१.४५ |
| १३ | कु. बुरांडे अमरजा | १४२ | ८७.८२ |
| १४ | चि. गंभीरे आकाश | १४२ | ८८.७३ |
| १५ | चि. कात्रे शरद | १४२ | ८८.११ |
| १६ | कु. चौधरी रूपाली | १४१ | ८९.०० |
| १७ | चि. क्षीरसागर शैलेश | १४१ | ८३.४५ |
| १८ | चि. ढगे सागर | १४० | ८१.०० |
| **सन २०१२** | | | |
| १ | कु. मालु शितल | १४४ | ९०.३६ |
| २ | कु. झिंगाडे सोनिका | १३४ | ८५.६४ |
| ३ | कु. पाटील अपूर्वा | १३३ | ९४.७९ |
| ४ | चि. उटगे शशांक | १३२ | ८६.०० |

| सन २०१२ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
| ५ | कु. कांबळे सुकन्या | १३२ | ९२.१८ |
| ६ | कु. मुदगल प्रिया | १३० | ८६.७३ |
| ७ | चि. वडे सौरभ | १२९ | ७९.८२ |
| ८ | कु. सडडू अनुराधा | १२८ | ८५.४५ |
| ९ | कु. सुरवसे स्वाती | १२८ | ८१.८२ |
| १० | कु. भालकीकर स्नेहा | १२८ | ८४.१८ |
| ११ | कु. कोव्हाळे सुवर्णा | १२८ | ८८.५५ |
| १२ | चि. कोरे संदेश | १२८ | ७८.५५ |
| १३ | चि. कांबळे शैलेश | १२६ | - |
| १४ | कु. डावळे सप्रिया | १३० | ८५.८२ |
| **सन २०१३** | | | |
| १ | कु. पत्तेवार निशा | १४९ | ९८.३६ |
| २ | कु. कंगले नागिनी | १४६ | ९५.०९ |
| ३ | कु. शिंदे प्रगती | १४४ | ९५.८२ |
| ४ | कु. कुलकर्णी प्राजक्ता | १४२ | ९२.७३ |
| ५ | कु. जांभळदरे मानसी | १३७ | ९२.३६ |
| ६ | चि. कोथळे संकेत | १३७ | ९१.६४ |

## सन २०१३

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ७ | कु. मोरे सोनाली | १३६ | ८९.६४ |
| ८ | चि. रंगकामे आकाश | १३३ | ८७.६४ |
| ९ | चि. मोरे अमोल | १३२ | ८६.५५ |
| १० | चि. जाधव रोहीत | १३२ | ८७.४५ |
| ११ | कु. घोगरे माधुरी | १३१ | ८४.३६ |
| १२ | चि. यादव शुभम | १३१ | ८३.६४ |
| १३ | कु. उटगे विशाखा | १३१ | ८९.२७ |
| १४ | कु. कांबळे प्रतिक्षा | १२९ | ८६.७३ |
| १५ | कु. स्वामी भक्ती | १२८ | ८६.०० |
| १६ | कु. शिंदे नेहा | १२६ | ८५.६४ |
| १७ | कु. काळदाते वनमाला | १२६ | ८५.०७ |
| १८ | कु. भालेकर पुनम | १२६ | ८५.६४ |

## सन २०१४

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कु. कांबळे कविता | १०० | ९७.६० |
| २ | कु. डावळे अंजली | १०० | ९१.६० |
| ३ | कु. केवळराम वैष्णवी | ९९ | ९२.४० |
| ४ | कु. बिराजदार स्मिता | ९९ | ९३.४० |
| ५ | चि. सडडू केदार | ९९ | ९६.८० |
| ६ | चि. सुरवसे स्नेहा | ९९ | ९६.०० |
| ७ | कु. उटगे श्रीदेवी | ९९ | ९५.६० |
| ८ | कु. मिटकरी साक्षी | ९८ | ९५.२० |
| ९ | कु. शिंदे प्रियंका | ९८ | ८८.२० |
| १० | चि. वडे संकेत | ९८ | ८४.४० |
| ११ | चि. चव्हाण चेतन | ९७ | ८७.६० |
| १२ | चि. शेख साहेबलाल | ९७ | ९२.४० |
| १३ | चि. पोटरे ऋषीकेश | ९७ | ९५.६० |
| १४ | चि. शिंदे प्रशांत | ९६ | ९३.८० |
| १५ | कु. गवळी शुभांगी | ९६ | ९२.६० |
| १६ | कु. फुटाणे पुनम | ९६ | ९०.६० |
| १७ | चि. दुरूगकर सुमित | ९६ | ८६.२० |

दशकपूर्ती सोहळा

# आमचे यशवंत विद्यार्थी ....

| सन २०१४ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
| १८ | कु. सुर्यवंशी स्वाती | ९६ | ९३.६० |
| १९ | चि. स्वामी मल्लीकार्जून | ९५ | ८९.०० |
| २० | चि. घोगरे शुभम | ९५ | ८९.०० |
| २१ | चि. लवटे शैलेश | ९५ | ९२.२० |
| २२ | कु. सुरवसे मिताली | ९४ | ९३.६० |
| २३ | कु. बंडगर प्रिया | ९३ | ८७.२० |
| २४ | कु. चव्हाण प्रिया | ९३ | ८९.८० |
| २५ | कु. मुदगल पुजा | ९३ | ८५.४० |
| २६ | चि. बिराजदार गणेश | ९२ | ७३.०० |
| २७ | चि. सडडू अमर | ९२ | ९३.४० |
| २८ | कु. माळी योगीता | ९२ | ९१.०० |
| २९ | चि. गायकवाड सुरज | ९२ | ९१.८० |
| ३० | कु. देशपांडे प्राची | ९१ | ८६.६० |
| ३१ | चि. कापसे संकेत | ९१ | ९१.२० |

| सन २०१४ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
| ३२ | चि. अजगरे स्वप्नील | ९० | ८६.०० |
| ३३ | चि. फुलसूंदर विशाल | ९० | ८६.४० |
| ३४ | चि. पठाण अशफाक | ९० | ८३.२० |
| ३५ | चि. कुलकर्णी नरहरी | ९० | ८५.४० |
| सन २०१५ | | | |
| १ | कु. काळदाते प्रिती | १०० | ८८.४० |
| २ | चि. घोडके शुभम | १०० | ९०.४० |
| ३ | कु. खंडागळे श्रध्दा | ९९ | ८६.८० |
| ४ | कु. कोथळे मयुरी | ९८ | ९१.८० |
| ५ | कु. फुटाणे कैवल्या | ९८ | ९५.०० |
| ६ | कु. यादव अस्मिता | ९८ | ९४.६० |
| ७ | कु. माळी संध्या | ९८ | ९१.२० |
| ८ | चि. कोव्हाळे सौरभ | ९८ | ८९.६० |
| ९ | चि. मासाने प्रशांत | ९८ | ९२.०० |
| १० | कु. काळदाते प्रिया | ९८ | ८५.०० |
| ११ | कु. कंगले आश्विनी | ९७ | ९२.२० |

# आमचे यशवंत विद्यार्थी ....

| सन २०१५ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्केवारी |
| १२ | चि. मोरे विशाल | ९६ | ८८.२० |
| १३ | चि. पाटील सुप्रिया | ९६ | ८६.६० |
| १४ | कु. कारंजे पुनम | ९५ | ८८.८० |
| १५ | चि. गवारे अभिषेक | ९४ | ८८.४० |
| १६ | चि. देवसाळे अभिषेक | ९४ | ९१.२० |
| १७ | कु. खुरपे आरती | ९३ | ९०.८० |
| १८ | कु. बिराजदार प्रतिक्षा | ९२ | ९१.०० |
| १९ | चि. उबाळे कृष्णकांत | ९२ | ७८.४० |
| २० | चि. कुलकर्णी प्रसाद | ९१ | ८५.८० |
| २१ | कु. कदम वैष्णवी | ९१ | ८६.४० |
| २२ | कु. मोरे शितल | ९१ | ९३.८० |
| २३ | कु. राचटटे पुजा | ९१ | ८७.६० |
| २४ | चि. जंगाले पवन | ९१ | -- |
| २५ | चि. हिवारे शुभम | ९० | ८१.६० |

# विविध पदावर कार्यरत असणारे विद्यार्थी...

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. सुप्रिया टिके | MBBS, (PHC नळदुर्ग) |
| २ | डॉ. सुचिता चेंडकाळे | B.A.M.S. |
| ३ | कु. भिसे साधना | Soft. Engineer, Pune |
| ४ | कु. कुलकर्णी पुनम | E & T Engineer, Pune |
| ५ | कु. वेजवाडे शितल | E & T Engineer, Pune |
| ६ | कु. पत्तेवार निशा | M. B. B. S (Appear) |
| ७ | कु. मालु शितल | M. B. B. S (Appear) |
| ८ | कु. राचटटे स्वाती | B. H. M. S |
| ९ | चि. भिसे सुहास | C. A, Pune |
| १० | कु. चंदेल पुजा | Engineer, Pune |
| ११ | कु. काटे ज्योत्सना | Nurse, P.H.C. Beed |
| १२ | कु. कदम मोहिनी | Engineer, Pune |
| १३ | कु. चौधारे रेणुका | B. A. M. S |
| १४ | चि. कांबळे आकाश | Engineer, Mumbai |
| १५ | चि. गवळी अनिल | E & T Engineer |
| १६ | चि. मुल्ला एकबाल | E & T Engineer |
| १७ | चि. कांबळे राजकिरण | Civil Engineer |
| १८ | चि. जाधव संदिप | Soft. Engineer |

उपलब्ध माहितीच्या आधारे आजपर्यंत B.E. पात्र असणारे १५० ते १६० विद्यार्थी Polytechnic पात्र असणारे २४०-२५० विद्यार्थी आहेत.

नजरचुकीने पदावर असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध नाही त्याबद्दल क्षमस्व ...

दशकपूर्ती सोहळा

# दशकपुर्तीच्या शुभेच्छा पर पत्र



**प्रिय मित्र,**
**श्री माधव कचरू गंगापूरे**
**यास स.न.वि.वि.**

मित्रा प्रथमत: तुझे व तुझ्या गंगापुरे Maths क्लासेसचे लाख लाख अभिनंदन ! आज रोजी तुझ्या क्लासेसची दशकपुर्ती. १० वर्षापुर्वी तु एक साधं गंगापुरे Maths क्लासेसचं रोपटं या औसा शहरात रूजवलं आणि आज संपूर्ण औसा तालुकाभर पसरणारं झालं. माझ्यासारख्या मित्रांसाठी नव्हे तर तालूक्यातील सर्व Maths Students साठी तो आधारवड झाला आहे.

या आधारवडाचा आज मलाच नव्हे तर संपुर्ण औसा तालुक्याला सार्थ अभिमान आहे. तो निव्वळ औशासारख्या व्यावसायिक शहरात तुझ्यामुळेच शैक्षणीक वातावरण तयार झाले.

अरे... तू विद्यार्थ्यांना शुन्याच महत्व सांगीतल पण तू तर शुन्यातूनच राज्य कसं निर्माण होतं याचं आदर्श घालून दिलास.

मला आठवतो तो तुझा जिवणप्रवास खरंच खुप खडतर होता तो... आटोळा सारख्या त्या खेड्यातून झालेलं तुझं शिक्षण आणि आज डोळ्याचे पारणे फेडतो तो तुझ्या यशाच्या उंचीचा शिखर. या यशाच्या उंचीवर तु पोहचलास त्याचं एकमेदर कारण काय असेल तर तुझी अभ्यासुवृत्ती, आणि परिश्रम व सर्वात महत्वाचा म्हणजे संयमीपणा !

तुझ्या स्वभावाविषयी काय सांगावे... उगाच आम्ही तुमचे मित्र नाहीत किंवा उगाच तुझ्यावर प्रेम करणारा एवढा मोठा मित्र परिवार नाही. त्याच कारण तुझ्या दिलदार स्वभावातच आहे.

अरे मित्रा आज तुला व मला अख्खा औसा तालुका एका वेगळ्याच नावाने ओळखतो. काही मंडळी आपल्याला वेगवेगळ्या उपमा देवून संबोधतात. जसे दो हंसो का जोडा, राम-लखन, राम-शाम, विलासरावजी व गोपीनाथराव मुंढे, आणि आता तर चक्क नरेंद्र मोदी व अमित शहा....

खुप बरं वाटतं रे मित्रा माझं नाव तुझ्यासोबत जोडल्यानं, याचा आनंद शब्दात नाही सांगता येणार.. तुझ्या या क्लासेसच्या दशकपुर्तीच्या निमित्ताने मी परमेश्वराकडे एवढीच विनंती करतो की, माझ्या मित्राला उदंड आयुष्य मिळो आणि गंगापुरे Maths क्लासेसच्या निमीत्ताने सरस्वतीची सेवा होवो. व तुला खुप लक्ष्मी प्राप्त होवो. तसेच पुढील काही वर्षात तुझ्या क्लासेसचा मला व अखंड महाराष्ट्राला सुवर्ण महोत्सव साजरा करताना पहायला मिळो.

परत एकदा गंगापुरे Maths क्लासेसच्या दशकपुर्ती सोहळ्याबद्दल मन:पुर्वक अभिनंदन करतो आणि तुझ्या पुढील वाटचालीला लाख लाख शुभेच्छा देतो...

तुझा मित्र,
**प्रा. अविनाश चव्हाण**
संचालक, श्री समर्थ इंग्लीश क्लासेस, औसा
M.A.Med.Eng. (L.L.B. App)

मनाची ओळख मनाला पटली की,
मैत्रीचे धागे आपोआप एकमेकांत गुंतले जातात
हे धागे एवढे घट्ट असतात की
प्रसंगी रक्ताची नातीही फिकी पडतात.

# आमची शैक्षणिक वैशिष्टे

- सुसज्ज हॉलची व्यवस्था
- प्रत्येक पाठावर आधारीत चाचणी परिक्षा
- इ. १० वी च्या HOTS उदाहरणाचा भरपूर सराव
- यशाची उज्वल परंपरा कायम
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष
- बायोमॅट्रीक अटेंडन्स
- परीक्षेचा निकाल SMS अलर्टस् व्दारा
- सेमी इंग्रजी माध्यमांसाठी वेगळया बॅचेस





Location Plan

# गंगापूरे Maths क्लासेस

संपर्क - मुक्तेश्वर मंदीर रोड, औसा

☎ 02383- 220399, 9673113000

www.facebook.com/madha[illegible]angapure

gangapuremaths@rediffm[illegible]com

9673113000

महालक्ष्मी डिजीटल, कोर्ट समोर औसा - ९८८०२२१९६२